**( डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत परभणीआर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वसतिगृहप्रवेशाकरिता करावयाचा अर्ज व नियमावली )**

फोटो

दिनांक :     /     / २०१८

प्रति.

मा.प्राचार्य तथा सदस्य सचिव, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना,

**शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर**

**विषय :** डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गतवसतिगृहातप्रवेश मिळणे बाबत.

अर्जदार -____________________________________________________

महोदय

वरील विषयानुसार मी विनंतीपुर्वक अर्ज सादर करीत आहे कि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८ / प्र. क्र. २४९ / तां.शी. ४ दि. १०-०८ २०१८ (व संकीर्ण-२०१८ / प्र. क्र. २४९ /१८/ तां.शी. ४ दि. १३-०७-२०१८) मध्ये नमूद केलेल्या अटी मी पूर्ण करीत असून कृपया मला परभणी येथे सुरु होत असलेल्या वसतिगृहात प्रवेश मिळावा हि नम्र विनंती.

माझी माहिती खालील प्रमाणे असून त्या बाबत कागदपत्राची छायाप्रत सोबत जोडत आहे.

१. सन २०१८-१९ वर्षामध्ये प्रवेशित शैक्षणिक संस्थेचे बोनाफाईड:

२. शिकत असलेला अभ्यासक्रम व वर्ष:

३. मागील वर्षाचे मार्कशीट:

४. सन २०१७-१८ चे उत्पन्न व त्याबाबतचे तहशीलदार यांचे प्रमाणपत्र अथवा पालकाचे आयकर नमुना १६ अ फार्म (रु. ८ लक्ष मर्यादेपर्यंतचे )

५. शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत

६. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे मिळालेल्या प्रवेशाचे पत्र / सी.ई.टी. परीक्षेबाबतचे पत्र. **(व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता** )

७. अधिवास प्रमाणपत्र ( Domicile Certificate)

८. रेशन कार्डची छायाप्रत

९. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असल्यास त्याबाबतचा सक्षम अधिकारी यांचा पुरावा.

१०. दिव्यांग असल्यास त्याबाबतचा सक्षम अधिकारी यांचा पुरावा.

११. परभणी पासून आपले मूळ रहाण्याचे ठिकाणचे अंतर.

## अर्जदार विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सदर करावयाची कागदपत्रे

i) मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत / चालू वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत

ii)महाराष्ट्र राज्याचा निवासी असल्याचा दाखला.( Domicile Certificate)

iii)महाविद्यालया मध्ये (A.T.K.T. ची सवलत न घेता )प्रवेश घेतल्याचा पुरावा.

iv)पालक नोकरी करत असल्यास आयकर नमुना १६-अ चा फॉर्म

v)आयकर पात्र पालाकांच्या आयकर विवरणपत्राची (Income Tax Return) प्रत

vi)आयकर पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालाकांनी तहसिलदार / सक्षम अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत.

vii) शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडून प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच , संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र.

## विद्यार्थ्यांकरिता नियमावली

१.वसतिगृहात प्रवेशास पात्र झाल्या नंतर विद्यार्थ्यांनी शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडून प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच,संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सदर करणे आवश्यक आहे अन्यथा वसतिगृहातील प्रवेश नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२.वसतिगृहातील वास्तव्य कालावधीत संबंधित वसतिगृहाचे वार्डन यांची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा गैरवर्तणूक केल्यास प्रवेश त्वरित रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.चालू शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाची उपस्थिती ७५% असणे आवश्यक आहे.

४.विद्यार्थ्यांने ज्या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे ती संस्था ज्या शहरात / गावात असेल आणि असा विद्यार्थी त्या शहरात/ गावात वास्तव्यास असेल तर त्या विद्यार्थ्यांस वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी अपात्र समजण्यात येईल.

५.कोणतीही नोकरी करत असलेला विद्यार्थी हा वसतिगृहात प्रवेशास अपात्र ठरेल.

६.वसतीगृहाच्या पहिल्या सत्राचा सर्वसाधारण कालावधी १० जून ते ३० नोव्हेंबर व दुसर्या सत्राचा कालावधी ०१ डिसेंबर ते ३० एप्रिल असा राहील. तथापि अभ्यासक्रमानुसार यामध्ये बदल करण्यात येईल.

७.डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली रु. १.लक्ष वार्षिक उत्पन्न असलेल्या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उच्चशिक्षण घेणाऱ्या व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अनुक्रमे रु. २०००/- व रु.१०००/- प्रतिवर्ष निर्वाह भत्ता शासनाकडून अनुज्ञेय असल्याने संस्थेने निर्धारित केलेल्या शुल्काच्या फरकाची रक्कम विद्यार्थ्यांने संस्थेस देणे बंधनकारक राहील.

८.प्रवेशसाठी अर्ज करताना अर्जात खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल.

९.ज्या विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखालीनिर्वाह भत्ताअनुज्ञेय नसेल अशा वसतीगृहामध्ये प्रवेशसाठीपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेताना विहित करण्यात आलेले व देय असणारे शुल्क प्रत्येक सत्राच्या सुरुवातीस भरणे आवश्यक राहील.

१०.विद्यार्थ्यांनी खानावळीची सोय उपलब्ध असल्यास खानावळीचे प्रत्येक महिन्याचे आगाऊ मासिक शुल्क व्यवस्थापनाकडे जमा करावे .

११. जर एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यांस बाहेर जावयाचे असेल , तर जाण्यापूर्वी त्याने व्यवस्थापन कार्यालास लेखी कळवणे आवश्यक अहजे. जर,विद्यार्थी समाधानकारक कारण न देता गैरहजर राहिला व वसतीगृहाचे नियम तोडण्याचा प्रयत्न केला तर वसतीगृह प्रमुख त्या विद्यार्थ्यांस खोली रिकामी करण्यास सांगू शकेल.

१२. वसतीगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने वसतीगृहाचे नियम पाळणे आवश्यक आहे व वसतीगृहातील विद्यार्थ्यांची एकूण वर्तणूक वसतीगृह प्रशासनाणे वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असणे वसतीगृहात बंधनकारक राहील.

१३. जर एखाद्या विद्यार्थ्यांस संस्थेविरुद्ध / व्यवस्थापनाविरुद्ध तक्रार असेल , तर तो विद्यार्थी संबंधित जिल्हाधिकारी तसेच विभागीय सहसंचालक , तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण यांच्याकडे लेखी तक्रार करू शकेल.

१४.प्रत्येक विद्यार्थ्यांस महाविद्यालय / संस्थेच्या प्राचार्य / संचालकाकडून प्रत्येक सत्रात ७५% हजेरी बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसे नसल्यास याबाबतची कारणमीमांसा द्यावी लागेल.

१५. वसतीगृहात अभ्यागतांना अधिवास अनुज्ञेय नाही.

आपला विश्वासू .

स्वाक्षरी :

संपूर्ण नाव :________________________________

संपूर्ण पत्ता :________________________________

________________________________

________________________________

मोबाईल क्रमांक : ______________________

टीप: विद्यार्थ्यांनी वरील अर्ज पूर्णपणे भरून कागदपतत्रांच्या साक्षांकित प्रतीअर्जासोबत जोडाव्यात.

## पालकाचे प्रमाणपत्र

वरील सर्व नियम मी वाचले असून माझा पाल्य वरील सर्व नियमांचे पालन करील अशी हमी देत आहे. जर माझ्या पाल्याकडून काही गैरवर्तणूक झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल या बाबत मला माहित आहे व त्यास माझी पूर्ण मान्यता आहे.

पालकाची दिनांकित स्वाक्षरी